International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# पर्यावरण जाणीव जागृतीत पत्रकारीतेचे योगदान

**प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे**
इतिहास विभाग प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर, जि.चंद्रपूर
*Corresponding Author-* **प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे**
***Email-*** rajurwadep9@gmail.com

**प्रस्तावना:-**

*कोणताही सजीव निर्माण होणे, वाढ होणे व नाश पावणे या नैसर्गिक क्रिया पूर्ण होण्यास ज्या सभोवतालच्या घटकांची गरज असते त्यास पर्यावरण असे म्हणतात. निसर्गाशी जोपर्यंत माणूस जोडला होता तोपर्यंत त्याने नियमाचे पालन केले. निसर्गापासून दुर गेल्यानंतर लोकसंख्येत वाढ झाली. बालमृत्यूचे कमी होणारे प्रमाण, मृत्यूदरात झालेली घट, आरोग्य आणि सेवांमध्ये होत असलेले संशोधन, जन्मदरात वाढ यामुळे लोकसंख्येचा विस्फोट झाला. मानवी भूक वाढत गेली. त्याचा सर्वात मोठा फटका निसर्गाला बसला. प्रत्येक सजीव अथवा निर्जीव वस्तूचा पर्यावरणाशी संबंध येतो. जगातील वाढती लोकसंख्या हीच निसर्गाच्या ओरबडणूकीस कारणीभूत ठरली. मानवी साधनामुळे पर्यावरणावर प्रभाव पडला तर त्याला प्रदुषण असे म्हणतात. याचा मानवी जीवनावर परिणाम होतो. मानवाच्या लालची स्वभावामुळे जल, वायू इतक्या मोठया प्रमाणात प्रदूषित झाले आहेत की ते पूर्वपदावर येणे अशक्य आहे. युरोप आणि जपानमध्ये शेतीसाठी इतक्या मोठया प्रमाणात जंगलतोड झाली की, ज्यामुळे पुन्हा त्या ठिकाणी जंगल निर्माण होण्यासाठी 50 ते 100 वर्ष लागतात. पर्यावरणाचे असमतोलपणा दुर करण्यासाठी मानवाला पुढे यायचे आहे. त्यासाठी लोकांचे समुपदेशन करण्याकरीता मिडीया, पर्यावरण पत्रकाराने पुढे येणे आवश्यक आहे. जागतिक स्तरावर प्रयत्न होत आहे. भारतात व विशेषत: महाराष्ट्रात होणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधकाने तेच मांडण्याचा प्रयत्न केला आहे.*

**विषयाची ओळख:-**

पृथ्वीवर एखादी गोष्ट नष्ट झाल्यानंतर पुर्नप्रस्थापीत होण्याची प्रक्रिया निरंतर सुरू असते. संसाधनांना पुर्नस्थापित करणेही तितकेच महत्वाचे आहे. विकसीत आणि विकसनशील देश अडचणीत सापडले आहेत. पर्यावरण प्रदूषित होत आहे. यासाठी सुशिक्षित व जागरूक नागरिक पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करू शकतात. आजचा मानव पर्यावरणाप्रती जागरूक झाला पाहीजे यासाठी मिडीया, पत्रकाराने पुढे येऊन पर्यावरणीय प्रदुशन का होते, कसे होते याविषयी जाणीव जागृती निर्माण केली पाहीजे. पर्यावरणाच्या प्रदुषणाला समोर आणणे माध्यमांचे काम आहे. महाराष्ट्रातील पत्रकार नागरिकांनी पर्यावरणाचे महत्व समाजाला समजावून सांगितले पाहीजे. पर्यावरण क्षेत्रातील वन, वन्य पशुशास्त्र, पर्यावरण नियंत्रण, पर्यावरण व्यवस्थापन, ऊर्जा प्रणाली आणि पर्यावरण नियोजन याविषयी पत्रकारानी, मिडीयाने भूमिका घेणे काळाची गरज आहे.

**संशोधनाचे अभ्यास क्षेत्र:-** सदर संशोधनाचे क्षेत्र पर्यावरण व मिडीयावर प्रकाश टाकते. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने मार्ग आणि साधने शोधणे ही रूपरेषा निश्चित केल्या जाते.

**संशोधनाचे ध्येय व उद्दिष्टे :-**

1. पर्यावरण व समाजमाध्यमे यांचा सहसंबंध स्पष्ट करणे.
2. पर्यावरण प्रश्नाविषयी शास्त्रीय व तात्वीक माहीतीचा प्रसार करणे.
3. पर्यावरण पत्रकारीतेचा प्रसार व प्रचार करणे.
4. जागतिक पातळीवर व भारतीय जनजीवनावरील प्रदुषणाचा अभ्यास, संशोधन करणे.

**संशोधनाची गृहितके:-**

1. सजीवसृष्टी व भोवतालचा परिसर यांच्यात संतुलन राखण्यासाठी प्रशासनाने व मिडीयाने परिस्थितीचे प्रारूप तयार करून निर्णय घेतले पाहीजे.
2. पर्यावरण संरक्षणासाठी आणि ते सुधारण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, मूल्ये, प्रवृत्ती तयार करणे काळाची गरज आहे.

3. सजीव सृष्टीतील वैविध्य जतन करणे, जाणीव जागृती समाज माध्यमाने केली पाहीजे.
4. पर्यावरणाविषयी जागरूकता वाढल्यामुळे पर्यावरण क्षेत्रात नजिकच्या भविष्यात करियरच्या उज्वल संधी उपलब्ध होतील याविषयी जाणीवजागृती करणे काळाची गरज आहे.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे. त्यात विविध संदर्भ ग्रंथाचा, पुस्तके, मासिके, विविध नियतकालीके, साप्ताहिक व वर्तमानपत्रे यांचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे शोधनिबंधाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**विषय प्रवेश :-**

सन 1962 साली अमेरीकेचे जीवशास्त्रज्ञ रशेल कार्सन (1907-1964) यांनी लिहिलेल्या 'सायलेंट स्प्रिंग' या पुस्तकाला आज 58 वर्ष झाले आहेत पण मागील वर्षातील पर्यावरण समस्या, सामाजिक, राजकीय, औद्योगिक मानसिकता अजून बदललेली नाही. 1960 पासून पर्यावरणवाद ही सामाजिक चळवळ जगात अग्रेसीत झाली याच पुस्तकाने. खुल्या अर्थव्यवस्थेनंतर माध्यमाची भुमिका पार बदलली आहे. चंगळवाद, वैयक्तिक प्रश्नांना प्राधान्य देण्यात येणारी माध्यमे पर्यावरण आणि निसर्गाच्या प्रश्नावर बोलत नाहीत. शासकीय अनास्था आहे. भारतातील अंतर्गत उत्पादनाच्या केवळ 0.012 इतके टक्का वाटा पर्यावरण राखण्यासाठी वापरला जातो. पर्यावरण रक्षणासाठी माध्यमे, त्यांचे पत्रकार कितपत काम करतात, प्रकर्षाने किती पुढे येतात यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे.[1]

**पर्यावरण जागृती व जगातील पत्रकारिता:-**

सन 2000 साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिखर परिषदेचे आयोजन केले होते. त्यामध्ये गरीबी, लिंग, आरोग्य, शिक्षण व पर्यावरण यांचा समावेश होता. पर्यावरणाची स्थिती योग्य राखणे आणि जागतिक संबंध सुधारणे असे लक्ष्य 2015 मध्ये ठरविण्यात आले होते.[2] लायला बावडम यांच्या अनुसार पर्यावरण पत्रकारीता नेहमी दुय्यमच राहीली आहे. केया आचार्य आणि फेड्रिक नोरोव्हा या पर्यावरण पत्रकारांनी भारत आणि दक्षिण आशियातील पत्रकारीता यावर पुस्तक लिहीले. त्यात भारत, पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, नेपाळ आणि मालदीव येथील पत्रकारानी आपआपले अनुभव मांडले. त्यात काझीमुद्दीन अग्रवाल, डिओनी बुन्षा, आर्देशीर कोवासजी, पीटर ग्राफ्रीन, मॅक्स मार्टीन, अहमत झकी नफीज, रिचर्ड महापात्रा, मालीनी शंकर इ. यांच्या निबंधाचा यात समावेश आहे.[3] 1972 साली युनोच्या सर्वसाधारण सभेने मानव व पर्यावरण याविषयी चर्चा घडून आणली होती. जागतिक पत्रकार पर्यावरणाविषयी जागरूक आहेत. जागतिक पर्यावरण दिवस वार्षिक उत्सव मोहीम साजरी करणे, अन्नधान्य नष्ट करणे, वन्य कटाई, ग्लोबल वार्मिग वाढविणे यासारख्या विषयावर लक्ष केंद्रित करतात. ग्रीन हाऊस इफेक्टस कमी करणे, आविकासीत जमीनीवर रोपे लावून बायो-इंधनाचे उत्पादन कसे वाढविता येईल याविषयी प्रत्यक्ष कृती करतात.[4] तसेच हायड्रोपावरचा उपयोग करणे, सौर वॉटर हिटस ऊर्जा वापरण्यास सामान्य लोकांना प्रोत्साहीत करण्यासाठी कार्बन तटस्थता यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्वसामान्य लोकांत जाणीव जागृती करतात.4

**पर्यावरण पत्रकारीता व भारत:-**

**संकल्पना:-** हवी फ्रोम (1998) यांच्या अनुसार 'सर्वसामान्य नागरिकांना पर्यावारणविषयक प्रश्नाच्या निर्णय प्रक्रियेत निश्चित आणि बिनचूक माहितीच्या आधारे सहभागी होता यावे. या उद्देशाने केलेले लेखन म्हणजे पत्रकारिता होय. पर्यावरणीय घटनेचे त्याला ज्ञान हवे, लोकांमध्ये जाणे, लोकांत मिसळणे, संवाद साधने, इंटरनेट, माहितीचा अधिकार त्याला वापरता येणे गरजेचे आहे. बातमीच्या पैलूबाबतची जागरूकता, शोधपत्रिकेची आवड, खोलापर्यंत केले जाणारे संशोधन त्याला करता येणे आवश्यक आहे.

**पर्यावरण पत्रकार कसा असावा?**

पर्यावरणीय पत्रकाराना धारणक्षमता, जैववैविध्य, पाणी, जंगल, जमीन, हवामान बदल, प्रदुषण, कृषी, लोकसंख्या, नागरीकरण, आरोग्य अशा विविध विषयातून पर्यावरण पत्रकारिता करता येते. जगभरात दरवर्षी अशुद्ध पाण्यामुळे वाढती रोगराई, त्यामुळे होणारे मृत्यू, पर्यावरण बदलामुळे निसर्गचक्रांत होत असलेली विविधता, घनकचरा, ई-कचऱ्यामुळे वाढत जाणाऱ्या समस्या, वन्य प्राण्याची होत असलेली कत्तल, विविध घडणाऱ्या घटना, चर्चा विविध परिषदा याकडे दुर्लक्ष करता येत नाही. जगभरात ज्या प्रकारे पर्यावरण विषयाकडे आंतरराष्ट्रीय माध्यमे बघतात. त्याकडे भारतातील व विशेषत: महाराष्ट्रातील पत्रकाराने बघितले पाहीजे. 19 ऑक्टोबर 2012 ला हैद्राबाद येथे एलेव्हन्थ कॉन्फेरन्स ऑफ पार्टीजचे

आयोजन केले होते. ही देशाचे लक्ष्य जैवविविधतेच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्यासाठी चांगली संधी होती. मात्र बऱ्याचशा गोष्टी लोकांपर्यंत पोहचल्या नाहीत.[5] कारण पत्रकारांनी याकडे लक्ष दिलेच नाहीत.

**पर्यावरण पत्रकारीतेकडे पाहण्याचा दृष्टीकोन :-**

पर्यावरण पत्रकार लायला बावडम यांच्या मतानुसार, "भारतीय पत्रकारांचा पर्यावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक आहे." पर्यावरण पत्रकारिता कमीपणाची मानली जाते. कुंदा दिक्षीत यांच्यामते, "अनेकांना पत्रकारीता आणि कार्यकर्ता यामधला भेद पुरेसा समजत नाहीत." 1991 च्या जागतिकीकरणानंतर पत्रकारांचा पर्यावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. 1990 पुर्वी बागकाम, वाघ, झाडे हेच पुर्वी पर्यावरण होते. पर्यावरण पत्रकारीता गंभीर पत्रकारीता आहे. अनिल अग्रवाल यांनी 'डाऊन टू अर्थ' नावाचे पर्यावरणाला वाहिलेले मासिक काढले तेव्हापासून पर्यावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. पर्यावरणात आता पाणी, भूसंपादन, वायू, नैसर्गिक अपारंपारीक ऊर्जा यांचाही समावेश होत आहे.[6]

**पर्यावरणात स्त्री पत्रकारीता:-**

जगभरासह देशातील आणि महाराष्ट्रातील माध्यमे हा लोकासमोरचा मोठा पर्याय आहे. शेजारची छोटी-छोटी राष्ट्रे पर्यावरणाच्या विषयाकडे गांभिर्याने पाहत असतांना आपण अजूनही विकासाचे प्रतिमान मिळविले नाहीत. सध्याचे भारताचे प्रतिमान अत्यंत दोषपूर्ण आहे. चंगळवाद, भौतिकवाद, दरडोई उत्पन्न, एकुण राष्ट्रीय उत्पन्न यावरून आजही आपण परंपरागत पध्दतीने मोजमाप करीत असतो. परंतू दारिद्र्यनिर्मूलन, आरोग्य, लोकसंख्येची बेसूमार वाढ व सुरक्षा आणि हवामानातील जैववैविधता हा प्रष्न काळजीचा असताना स्त्रियांचा सहभाग आपण घेत नसतो. पर्यावरणाशी स्त्रियांचे नाते ऐतिहासिक आहे.[7] स्त्रियांचे पर्यावरणाषी असलेले नाते भरण-पोषणाच्या गरजेने प्रभावीत आहे. परंतू पुरूष व्यावहारीक लाभासाठी पर्यावरणाचे शोषण करतात. पर्यावरण पत्रकारीतेमध्ये स्त्रीयांचा सहभाग बोटावर मोजण्यासारखा आहे. स्त्रियांना या क्षेत्रात सुध्दा दुय्यम ठेवले आहे. या क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम मानले गेले. त्याचबरोबर तीचे प्रश्न सुध्दा दुय्यम ठरविले आहे. पण तरीही कुंदना दिक्षीत, मेघा पाटकर, पत्रलेखा चॅटर्जी, मीना मेनन, लक्ष्मीमूर्ती, सुनीता नारायण, बीना सरवर, सहाना सिंग, मालिनी शंकर, कल्पना शर्मा, मनोरी विजयसेखरा इ महिलांची नावे आपणास घेता येईल.[8]

**पर्यावरण जागृती व समाज माध्यमाची भूमिका:-**

1980 च्या दशकात प्रसारमाध्यमांनी पर्यावरण चळवळीस प्रसिध्दी त्यात साहित्याची भूमिका महत्वाची आहे त्यांनी समाजमन तयार करण्यासाठी परिश्रम घेतले. विविध सर्वेक्षणातून हे सिध्द झाले आहे की, 80 टक्के माणसांना दुरचित्रवाणीहून, 50 टक्के माणसांना रेडीओव्दारे माहिती मिळते आणि भारतीय मुद्रीत माध्यमात पर्यावरणविषयक बातम्यांना 1.5 टक्के इतके नगण्य स्थान देतात. पर्यावरणाला वाहीलेले बरेचसे साहित्य उपलब्ध आहे. पाणी, जमीन, सागर संपत्ती, जंगल संपत्ती अशा पर्यावरणासाठीच्या स्थानिक पातळीवरील संघर्षाची माहिती घेतली आहे. विविध कायदे, पर्यावरण चळवळीविषयी अनेक संदर्भ येतात. याचबरोबर भारतातील संकटग्रस्त पक्ष्याच्या आधारावर पुस्तक आहेत. अणूप्रकल्पाविषयी जनमत करण्याचे कार्य पुस्तकानी, पत्रकारानी केले. माळढोक पक्ष्याचे संवर्धन झाले पाहीजे यासाठी मोहीम राबविली. दारिद्र्य आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांचा परस्परसंबंध लावलेला आहे.[9] पर्यावरण जतनामध्ये माहिती तंत्रज्ञानाची मदत गरजेची आहे. नैसर्गिक संसाधनाचा व स्त्रोतांचा काटकसरीने वापर केल्यास दर्जेदार जीवनपध्दती निर्माण होईल याविषयी विविध माध्यमातून लेखन झाले आहे. हवामान बदलामुळे शेतीवर काय परिणाम होतो याविषयी सुध्दा जाणीवजागृती माध्यमे करतात.[10] ग्लोबल वार्मींग आणि हवामान बदलाच्या संकल्पनाचा प्रचार व प्रसार जनमाणसात प्रसारमाध्यमे करतात. तापमानवाढ आणि भारतात ओझोनचा थर, तापमानवाढीशी कसे जुळते याविषयी माध्यमे धावता आढावा घेतात. वृक्षारोपन, हरीतगृहवायू, तापमान वाढ, जमीन प्रदुषण, कचरा, ई-कचरा, प्लास्टिक, विजेचा वापर, अणुवीज, ध्वनीप्रदूषण इत्यादी विषयाची उकल आजची माध्यमे करतात.[11]

**निष्कर्ष :-** पर्यावरण हा आजच्या काळातील परवलीचा शब्द आहे. जनसामान्यामध्ये पर्यावरणाच्या मुलभूत संकल्पनाबाबत समज-गैरसमज आहेत. परिणामी ते सोडविण्यासाठी जनमताच्या रेटयातून निर्माण होणारी राजकीय इच्छाशक्ती राजकीय व्यक्तीमध्ये निर्माण होत नाही. कचरा, झाडेतोड, ध्वनीप्रदुषण, वायुप्रदुषण, याविरूध्द आवाज उठविला पाहीजे. प्रत्यक्ष तक्रार करणे, फोनवरून कळविणे, वर्तमानातून प्रसिध्द करणे काळाची गरज आहे. निसर्ग संवर्धन करणे ही आपली तितकीच महत्वाची जबाबदारी आहे. नैसर्गिक

संसाधनाचा व स्त्रोतांचा काटकसरीने वापर केल्यास जीवनशैली व पर्यावरणाचा नक्कीच फायदा मिळेल.

**संदर्भ ग्रंथ:**- 1.शिंत्रे संतोष - भारतीय निसर्ग पर्यावरण पत्रकारीता, सकाळ प्रकाशन, प्रथमावृत्ती, जाने. 2013, पृ.क्र. 13

2.पुर्वोक्त – 13

3.http://biodiversity.medianing.co

4.www.batmidar.com. & - 07 जुन 2019

5.कुलकर्णी शिल्पा - पर्यावरण आणि समाज, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती ऑगस्ट 2008

6.public watch 2011, center for science and environment 2011

7.गजेंद्रवाडकर वर्षा - स्त्री आणि पर्यावरण, पदमगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती जानेवारी 2013 पृ. क्र. 18

8.पुर्वोक्त - पृ.क्र. 19

9.नायर पी. गोपीनाथ - पर्यावरण संरक्षण और चुनौतीया

10.शिंत्रे संतोष - भारतीय निसर्ग पर्यावरण पत्रकारीता, सकाळ प्रकाशन, 2013 पृ. क्र. 18

11.पुर्वोक्त - पृ.क्र. 19